# मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक), कोल्हापूर यांचे कार्यालय

" वनवर्धन ", प्रधान डाकघरासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

☎कार्यालय-०२३१/२६५३६३२, निवास-२६५३६३४, फॅक्स-२६५९२३३ E-mail-ccftkolhapur@gmail.com

**पत्र :**

क्रमांक : कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१५/५८४५
कोल्हापूर - ३. दिनांक :- ९/३/२०१६

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि वनसंवर्धन तज्ञ, पुणे
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर
मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष-मुंबई
वनसंरक्षक, कार्यआयोजना विभाग, कोल्हापूर
उपवनसंरक्षक, कोल्हापूर/सातारा/सावंतवाडी
विभागीय वन अधिकारी, सांगली /रत्नागिरी (चिपळूण).
उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
कोल्हापूर/सातारा/सागंली/रत्नागिरी/सिंधुदूर्ग.

विषय - वनविभागाकडील "वनरक्षक" व सामाजिक वनीकरण विभागाकडील " रोपवन कोतवाल " या संवर्गाची दि. १/१/२०१५ रोजीची अंतिम जेष्ठतायादी प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ : १.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१५/२११९, दि. ३/८/२०१५.
२.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१५/८८९, दि. २९/९/२०१५.

आपले लक्ष संदर्भीय पत्राकडे वेधण्यात येत आहे. या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वनरक्षक/रोपवन कोतवाल या संवर्गाची दि. १/१/२०१५ रोजीची प्राथमिक जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली होती. ज्या विभागाकडून जेष्ठता यादीवर आवश्यकत्या कागदपत्रावर आक्षेप / त्रूटी कळविल्या होत्या त्याप्रमाणे आक्षेपाची पूर्तता करणेत आली आहे. सदर जेष्ठता यादीमध्ये बऱ्याच वनरक्षक/रोपवन कोतवाल यांची पूर्ण नांवे / जात प्रवर्ग / जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याची माहिती / प्रशिक्षित-अप्रशिक्षित / आंतरवृत्तीय बदलीने हजर झालेली तारीख इ.बाबी विभागाकडून प्राप्त झालेल्या नाहीत. या कार्यालयाकडून प्राप्त माहितीवरुन नियमानुसार वनरक्षक/रोपवन कोतवाल संवर्गाची दि. १/१/२०१५ रोजीची जेष्ठता यादी अंतीम स्वरूपात प्रसिध्द करण्यात येत आहे त्यामूळे जेष्ठतेबाबत कुठलेही प्रकरण उद्भवल्यास त्यास आपले कार्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

सदरची अंतिम जेष्ठता यादी आपले विभागातील संबंधीत कर्मचारी यांचे निदर्शनास तात्काळ आणुन द्यावी. सदर जेष्ठतायादी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.kolhapurforest.co.in यावर प्रसिध्द करणेत आली आहे.

(एम.के.राव)
मुख्य वनसंरक्षक(प्रा.), कोल्हापूर.

प्रतिलिपी: मुख्य वनसंरक्षक व उपमहासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे / ठाणे यांना माहिती व तत्सम आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

(एम.के.राव)
मुख्य वनसंरक्षक(प्रा.), कोल्हापूर. प्रत :

सौ.आशा राजन शिंदे, वनरक्षक निर्देशन विभाग कोल्हापूर यांना माहिती व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी.